लोकमत अकोला, शनिवार, दि. १७ ऑगस्ट २०१३ 

# राष्ट्रीय स्तरावर मेरिटचे मानकरी

चिखली : पुणे विद्यापीठ व केंद्रशासन अंगीकृत राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्या नामांकित समजल्या जाणारी परीक्षा २०१३ चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयातील दोन विद्यार्थी निलेश शेळके ८ वा तर अजय भोसले ११ व्या क्रमांकावर राष्ट्रीय स्तरावरील मेरीटचे मानकरी ठरले आहेत. या परीक्षेमध्ये महाविद्यालयाला दुसऱ्यांना यश प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल प्राचार्य डॉ.निळकंठ भुसारी, विभागप्रमुख प्रा.जी.एम.डोंगरे, प्रा.कुंभारे, प्रा.पवार, सोळंकी, भोंडे, भटकर यांनी समाधान व्यक्त केले आहे. (तालुका प्रतिनिधी)